दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com | संपादक : अजय भांगे | https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • रविवार दि.२३ नोव्हेंबर २०२५ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक ९३ • पाने ४ • किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi • Sunday 23 Nov 2025 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 93 • Pages 4 • Rate 4 Rs

### जबाबदारी आता थेट प्रशासनावर

**मुंबई–** विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीची जबाबदारी आता थेट एसटीच्या स्थानिक प्रशासनावर टाकण्यात आली आहे. बसेस उशिरा सुटल्याने किंवा रद्द झाल्याने जर विद्यार्थ्यांचे तास चुकले, ते परीक्षेला उशीर झाला किंवा एखादी परीक्षा बुडाली, तर त्यासाठी संबंधित आगार व्यवस्थापक आणि पर्यवेक्षक जबाबदार धरले जाणार आहेत. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीचे जितके दिवस, तितके दिवस संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करणे किंवा सक्तीची रजा देणे, अशा कठोर कारवाईचे आदेशही सरनाईक यांनी दिले आहेत. त्यामुळे एसटी प्रशासनावर शालेय बस फेऱ्या वेळेत आणि नियमितपणे चालवण्याची जबाबदारी आणखी कडक झाली आहे.

# नागपुरात ७० कोटींचे संत्र्याचे क्लीन प्लांट सेंटर

## केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंग चौहान यांची ग्रोव्हीजनमध्ये घोषणा

दैनिक वादळ वार्ता

**नागपूर (वृत्तसंस्था)–**केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंग चौहान यांनी नागपुरात ७० कोटी रुपये खर्चाचे संत्र्याचे क्लीन प्लांट सेंटर स्थापन करण्याची घोषणा केली आहे. ग्रोव्हीजन कृषी प्रदर्शनाच्या उद्घाटनावेळी ते बोलत होते. हे प्रदर्शन नागपूर विद्यापीठाच्या अमरावती रोडवरील मैदानावर आयोजित करण्यात आले. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.चौहान यांनी सांगितले की, शेतकऱ्यांना चांगल्या प्रतीची रोपे मिळाल्यासच त्यांना चांगले उत्पादन घेता येईल. मोठ्या नर्सरींना ४ कोटींपर्यंत, तर छोट्या आणि मध्यम नर्सरींना २ कोटींपर्यंत आर्थिक सहाय्य दिले जाईल. शेतकरी हा अन्नदाता असून त्यांचे जीवनमान सुधारण्यावर सरकारचा भर असल्याचे त्यांनी नमूद केले. दालमिल सुरू करण्यासाठी सबसिडी दिली जात असल्याचेही त्यांनी सांगितले.



केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी यावेळी बोलताना सांगितले की, स्पेनमधील फार्मर बिझनेस स्कूलच्या धर्तीवर अमरावती रोडवरील पीडीकेव्ही मैदानावर ग्रो कन्व्हेन्शन सेंटरमध्ये जागतिक दर्जाचे फार्मर बिझनेस स्कूल तयार होत आहे. याचा लाभ केवळ विदर्भातीलच नव्हे, तर संपूर्ण देशातील शेतकऱ्यांना मिळेल आणि त्यांच्या आर्थिक विकासाला गती मिळेल, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी शेतकऱ्यांना शेतीत चांगले प्रयोग, उत्तम वाणांचा वापर आणि शेतीपूरक व्यवसाय करण्याचा सल्ला दिला. पेरणीपासून कापणीपर्यंत राज्य सरकारचा कृषी विभाग शेतकऱ्यांना पूर्ण सहकार्य करण्यास तत्पर असल्याचे त्यांनी सांगितले. ग्रोव्हीजनमधून मिळालेल्या सूचना आणि मार्गदर्शनावर राज्य सरकार सकारात्मक विचार करेल, असे आश्वासनही त्यांनी दिले.भारतात सध्या दुग्धव्यवसाय उद्योगात मोठे बदल होत आहेत. २०१६ मध्ये एनडीडीबीने विदर्भात काम सुरू केले. पुढील वर्षी ग्रोव्हीजनमध्येच ६ लाख लीटर क्षमतेच्या प्रकल्पाचे उद्घाटन होईल, असे आश्वासन देण्यात आले. याव्यतिरिक्त, शुक्रवारी बुटीबोरी येथे जनावरांच्या चारा प्रकल्पाचे भूमिपूजन झाले असून, हा प्रकल्प २०२६ पर्यंत कार्यान्वित होईल.

## उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचे रमेशराव आडसकर यांच्या हस्ते स्वागत



दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे उप मुख्यमंत्री आणि बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजितदादा पवार साहेब हे बीड जिल्ह्यात आले असता,केज येथून जात असताना राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे जेष्ठ नेते रमेशराव आडसकर यांनी केज येथे भेट घेऊन चालू घडामोडीं व विकासात्मक बाबींची थोडक्यात माहिती देऊन उपस्थित प्रमुख कार्यकर्ते यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. यावेळी अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन श्री.रमेशराव आडसकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अंकुशराजी इंगळे, राष्ट्रवादी कॉँग्रेसचे ज्येष्ठ नेते दिलीप आबा गुळभिले,राष्ट्रवादी कॉँग्रेस तालुकाध्यक्ष अमर पाटील,युवकतालुकाध्यक्ष शिवदास थळकरी,रंजीत दादा आडसकर तसेच इतर मान्यवर व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.स्थानिक समस्या, विकासकामे व विविध योजनांबाबत थोडक्यात चर्चा करण्यात आली. केज तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी राज्यसरकार सकारात्मक असल्याचे अजितदादा पवार यांनी यावेळी सांगितले.

## चिंचोली माळीचे–सारुक वाडी उपसरपंच महाशय तुपाशी,गावकरी मात्र उपाशी?

दैनिक वादळ वार्ता । **केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील मौजे चिंचोली माळी सारुकवाडी येथील उपसरपंच सौ. गीता धीरज वनवे यांनी जलजिवन मिशन पाणी पुरवठा योजनेची विहीर व पाइपलाइन स्वताची व नातेवाईकाची जमीन भिजवण्यास पाणी वापत असुन चिंचोली माळी सारुकवाडी उपसरपंच तुपाशी, गावकरी मात्र उपाशी असल्याची माहिती समोर आली असून अशा उपसरपंचावर तात्काळ कारवाई करण्यात यावी अशी मागणी तक्रार अर्जातुन करण्यात आली आहे.या विषयी सविस्तर वृत्त असे की चिंचोली माळी ता. केज अंतर्गत सारुकवाडी गाव आहे. सदर गावास पाणी पुरवठा करण्यासाठी जलजिवन मिशन अंतर्गत एम.आर.ई.जि.एस.च्या माध्यमातून नदीकाठी बुडीत क्षेत्रात विहीर खोदलेली आहे. त्या विहीरवरुन गीता धीरज वनवे व त्यांचे नातेवाईक जलजिवन मिशन अंतर्गत केलेल्या पाईपलाईन व्दारे त्यांच्या शेतासाठी पाणी वापरीत असुन गावातील नागरिक पाण्यासाठी ग्रामपंचायत कडे वारंवार निवेदने देत आहेत. तसेच गावातील कोणी या विहरीची विचारणा करण्यासाठी गेले असता ते स्वतः सरपंच असल्याचा अधिकार सांगत आहे. तरी ती विहीर सन २०१९-२०२० मध्ये झालेली असुन तेंव्हापासुन या विहरीवर त्यांनी अतीक्रमण केलेले आहे. तरी में. साहेबांनी सदरील व्यक्तीवर योग्य ती कार्यवाही करुन विहीर गावक-यांसाठी खुली करुन देण्यात यावी अशी मागणी तक्रार अर्जातुन करण्यात आली आहे .

## मालेगाव बलात्कार–हत्या प्रकरण: आरोपी संजय खैरनारला फाशी द्यावी; टायगर ग्रुप तळोदाची पोलीस निरीक्षकांना मागणी



दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

मालेगाव तालुक्यातील डोंगराळे गावात तीन वर्षीय चिमुकलीवर झालेल्या बलात्कार आणि हत्या प्रकरणी खानदेश विभाग टायगर ग्रुप, तळोदा यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. सदर घटनेतील आरोपीला तत्काळ फाशीची शिक्षा व्हावी, या मागणीसाठी टायगर ग्रुपच्या पदाधिकाऱ्यांनी तळोदा पोलीस निरीक्षक राजन मोरे यांना रीतसर नुकतेच निवेदन सादर केले.टायगर ग्रुपने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, डोंगराळे येथे घडलेली ही घटना अत्यंत दुर्दैवी आणि माणुसकीला कलंक लावणारी आहे. आरोपी संजय खैरनार याने क्रूर कृत्य केले असून, त्याला कठोर शिक्षा होणे गरजेचे आहे. निवेदनाद्वारे टायगर ग्रुपने मागणी केली आहे की, आरोपी संजय खैरनारवरची केस फास्ट ट्रॅक कोर्टात चालवण्यात यावी आणि या प्रकरणाचा निकाल लवकरात लवकर लावून त्याला फाशीची शिक्षा देण्यात यावी.यावेळी निवेदन देताना शुभम खाटीक (शहराध्यक्ष, तळोदा), शैलेश बारोट, शाहरुख शेख, पप्पू न्हावी, पंकज मराठे, विनोद मराठे, गणेश पाटील, जुनेद मंसूरी, सुमित नदभवर, शरद सावळे, सादिल पिंजारी आदी टायगर ग्रुपचे सदस्य उपस्थित होते.

## गुरव समाजाचा नंदुरबार निवडणुकीत 'सत्ताधाऱ्यांना' थेट इशारा: मागण्या मान्य करा, नाहीतर मतदान नाही!

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

नंदुरबार, तळोदा आणि शहादा नगरपालिका निवडणुकांच्या तोंडावर समस्त दाहीगाव गुरव समाज संस्था, नंदुरबार यांनी मोठी राजकीय भूमिका जाहीर केली आहे. समाजाच्या दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या पाच महत्त्वाच्या मागण्या त्वरित पूर्ण करण्याची लेखी हमी देणाऱ्या उमेदवारांनाच पाठिंबा देण्याचा स्पष्ट इशारा समाजाने दिला आहे.

संस्थेचे अध्यक्ष सतीश कुवर यांनी एक निवेदन प्रसिद्ध केले. या निवेदनात गुरव समाज हा देवाधिदेव महादेवांची सेवा करणारा आणि अत्यल्प आर्थिक उत्पन्न असलेला, परंतु अनेक दशके सातत्याने दुर्लक्षित राहिलेला समाज असल्याचे नमूद केले आहे.

आगामी नगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी पाच अत्यंत महत्त्वपूर्ण मागण्यांवर त्वरित कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली आहे. नंदुरबार शहरात किमान १५००० चौ. फूट जागेसह गुरव समाज भवनाचे त्वरित बांधकाम सुरू करावे.तळोदा शहरात किमान १०००० चौ. फूट जागेसह समाज भवन मंजूर करावे.तळोदा शहरातील मुख्य रस्त्यावरील प्रमुख चौकास 'संत काशिबा महाराज चौक' असे नामकरण करावे.

प्रकाशा (ता. शहादा) येथील गेल्या १० वर्षांपासून निधीअभावी प्रलंबित असलेले गुरव समाज भवनाचे काम त्वरित पूर्ण करावे. शहादा शहरातील मुख्य रस्त्यावरील चौकास 'संत काशिबा महाराज चौक' असे अधिकृत नामकरण करावे.



**गुरव समाजाने आपली राजकीय भूमिका अत्यंत स्पष्ट केली आहे. सतीश कुवर यांनी जाहीर केले की, ज्या पक्षाचे नगराध्यक्ष किंवा नगरसेवक उमेदवार आमच्या सर्व मागण्या लिखित स्वरूपात मान्य करतील व त्यावर वेळेत अंमलबजावणी करतील, केवळ त्याच पक्षाला व उमेदवारांना संपूर्ण गुरव समाज ठाम पाठींबा देईल.यापुढे जो उमेदवार लेखी हमी देईल, त्याच्या विजयासाठी समाज एकदिलाने मतदान करेल. दुर्लक्ष करणाऱ्या कोणत्याही उमेदवाराला पाठिंबा दिला जाणार नाही.** गुरव समाजाची ताकद ही एकमत मतदानाची ताकद आहे. ही ताकद आम्ही आगामी निवडणूक प्रक्रियेत स्पष्टपणे दाखवून देऊ, असा निर्वाणीचा इशारा संस्थेने स्थानिक लोकप्रतिनिधी आणि राजकीय पक्षांना दिला आहे.

## उमेदवारी रद्द झाल्याचा आरोप! कॉँग्रेस नेते दिलावर शाह यांचा शिंदे गटात प्रवेश

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

कॉँग्रेसकडून आपल्या मुलाला निवडणुकीसाठी जाणीवपूर्वक चुकीचा एबी फॉर्म देण्यात आल्याचा गंभीर आरोप करत महाराष्ट्र प्रदेश कॉँग्रेस कमिटीचे (झोपडपट्टी सेल) उत्तर महाराष्ट्र कार्याध्यक्ष दिलावर शाह कादर शाह यांनी पक्षाला सोडचिठ्ठी दिली आहे. २० नोव्हेंबर २०२५ रोजी त्यांनी आमदार चंद्रकांत रघुवंशी यांच्या उपस्थितीत शिंदे गटाच्या शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.



दिलावर शाह यांचे चिरंजीव मोईनोद्दीन शाह दिलावर शाह यांनी प्रभाग क्रमांक १८ ब मधून कॉँग्रेसकडून उमेदवारी अर्ज भरला होता.

स्थानिक नेते (भाई नगराळे, प्रकाश सोनवणे, माजी मंत्री केसी पाडवी, देवा चौधरी) यांनी प्रभाग १८ ब ऐवजी प्रभाग क्रमांक १९ चा एबी फॉर्म दिला. या चुकीमुळे मोईनोद्दीन शाह यांची उमेदवारी रद्द झाली. शाह यांनी या कथित दुर्लक्षाबद्दल संबंधित नेत्यांवर कारवाई करण्याची मागणी पक्षाच्या वरिष्ठांकडे केली होती.

चुकीच्या फॉर्ममुळे उमेदवारी रद्द झाल्याने शाह यांनी पक्षावर तीव्र नाराजी व्यक्त केली. या नाराजीमुळे त्यांनी कॉँग्रेसला सोडचिठ्ठी देऊन शिंदे गटाच्या शिवसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. आमदार चंद्रकांत रघुवंशी यांनी त्यांचे पक्षात स्वागत केले.

दिलावर शाह यांच्या या प्रवेशामुळे नंदुरबारच्या स्थानिक राजकारणात मोठे बदल घडून नवीन समीकरणे निर्माण होण्याची शक्यता राजकीय विश्लेषकांनी व्यक्त केली आहे.

## आंतरशालेय इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत आदर्श विद्यालय बनसारोळा येथील यश जोगदंड द्वितीय

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

अंबाजोगाई येथील छत्रपती संभाजी राजे ग्लोबल स्कूल आणि ज्यूनिअर कॉलेज आयोजित आंतरशालेय इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत आदर्श माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बनसारोळा ता.केज येथील विद्यार्थी चि.यश नामदेव जोगदंड इयत्ता ५वी याने उल्लेखनीय कामगिरी करत द्वितीय क्रमांक पटकावला.



या स्पर्धेत सर्व स्पर्धक विद्यार्थी इंग्रजी माध्यमा तील असूनही,मराठी माध्यमातील यशने अत्यंत आत्मविश्वासाने इंग्रजीत आपले सादरीकरण सादर करत परीक्षक आणि प्रेक्षकांची मने जिंकली. प्रभावी उच्चार,स्वच्छ मांडणी व आत्मविश्वास पूर्ण सादरीकरणाच्या जोरावर यशने दुसरा क्रमांक मिळवत शाळेचे नाव उज्ज्वल केले.यशच्या या उत्कृष्ट यशा बद्दल त्याला मार्गदर्शन करणारे इंग्रजी विषय शिक्षक श्री.रोकडे एस. व्ही.तसेच शाळेचे मुख्याध्यापिका श्रीमती चव्हाण मॅडम,संस्थेचे अध्यक्ष अशोकराव काकडे,सचिव बालासाहेब काकडे व सर्व शिक्षकवृंदांनी त्याचे मन:पूर्वक अभिनंदन केले आहे.

संपादकीय

## नगरपरिषद निवडणुकांनी विदर्भात घुसळण

विदर्भातील ८० नगर परिषदा आणि २० नगरपंचायत यांच्यातील निवडणुका जाहीर होऊन आता काळ पुढे सरकला आहे. निवडणुकांची अधिसूचनाही जाहीर झाली आणि अर्ज दाखल करण्याची तारीखही निघून गेली आहे. आज हे वार्तापत्र लिहीत असताना उमेदवारी अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया सुरू असून दिवससंपेपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेतलेले असतील. त्यानंतर विदर्भातील निवडणुकांचे चित्र स्पष्ट होईल. चांगलीच गती आलेली दिसते आहे.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका म्हणजे त्या-त्या परिसरातील आमदार, पालकमंत्री, खासदार अशा सर्व तत्सम नेत्यांच्या नेतृत्वाची कसोटी लागत असते. तशी विदर्भातही लागणार आहे. मात्र खरी कसोटी लागणार आहे ती काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाची. काँग्रेसमध्ये महाराष्ट्र स्तरावर नेतृत्व बदल होऊन जेमतेम चार-पाच महिने झाले आणि हर्षवर्धन सपकाळ यांच्या रूपाने बुलढाणा जिल्ह्याकडे हे नेतृत्व आले आहे. हर्षवर्धन सपकाळ यांनी या कालखंडात पक्षात नवे चैतन्य फुंकण्याचा प्रयत्न जरूर केला आहे. त्यामुळे आता विदर्भात काँग्रेसला किती यश मिळते त्यावर सपकाळांचे नेतृत्व महाराष्ट्रात कितपत यशस्वी ठरू शकते हे ठरवले जाणार आहे. परिणामी विदर्भातील यशापयश हे काँग्रेसकरिता विशेष महत्त्वाचे राहणार आहे. विदर्भातील आजचे राजकीय चित्र बघता खरी लढत ही भाजप आणि काँग्रेस या दोन पक्षांतच होणार आहे हे निश्चित. त्या खालोखाल वंचित बहुजन आघाडी ही बुलढाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ, वाशिम या जिल्ह्यांमध्ये आपले थोडेफार का होईना पण अस्तित्व ठेवून आहे. उर्वरित दोन्ही शिवसेना आणि दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस यांना तर आपले अस्तित्व टिकवण्यासाठीच या निवडणुकीत बरीच धडपड करावी लागणार आहे. महाराष्ट्रात आम्ही शक्यतोवर महायुती म्हणून एकत्रच लढू असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस वारंवार सांगत असले तरी विदर्भात देखील कुठेच महायुतीतील तिन्ही घटक पक्ष एकत्र लढताना दिसत नाहीत. त्यातच मोठ्या प्रमाणात बंडखोरी देखील झालेली दिसते आहे. सर्वच पक्षांच्या पक्षश्रेष्ठींचे बंडखोरांना विविध आमिषे दाखवून शांत करण्याचे प्रयत्न चालू आहेत. आज दिवसाअखेर जितके प्रयत्न यशस्वी होतील तितके बंडखोर खाली बसतील. अन्यथा बहुतेक ठिकाणी बहुरंगी लढती या स्पष्ट दिसत आहेत.पश्चिम विदर्भातील नगर परिषद व नगरपंचायत निवडणुकीतील राजकारणावर यंदा नातेसंबंधांचा पगडा स्पष्टपणे जाणवतो. विविध पक्षांकडून मोठ्या संख्येने उमेदवारी अर्ज सादर झालेत. विशेष म्हणजे, या निवडणुकीत कार्यकर्त्यांना संधी देण्याची परंपरा बाजूला सारत अनेक दिग्गज नेत्यांनी आपल्या जवळच्या नातेवाइकांनाच थेट रिंगणात उतरवले. अकोला, बुलडाणा आणि वाशीम जिल्ह्यांतील २५ नगर परिषदांमध्ये तब्बल दहा ठिकाणी नेत्यांच्या पत्नी, वहिनी, भाऊ आणि सून उमेदवार म्हणून उभे आहेत. बुलढाणा जिल्ह्यात कामगार मंत्री आकाश फुंडकर यांची वहिनी अपर्णा फुंडकर या नगराध्यक्षपदासाठी रिंगणात उतरल्या आहेत. बुलडाणा नगरपालिकेत शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांच्या पत्नी पूजा उमेदवार आहेत. त्यांच्या विरोधात माजी आमदार तथा भाजप जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांच्या पत्नी अर्पिता शिंदे रिंगणात उतरल्याने चुरस वाढली. अकोला जिल्ह्यात माजी आमदार नातिकोद्दीन खतीब यांच्या पत्नी रजिया बेगम या वंचित बहुजन आघाडी नगरविकास फ्रंटतर्फे नगराध्यक्षपदासाठी उमेदवार आहेत. अकोटमध्ये माजी राज्यमंत्री रामदास बोडखे यांची सून तसेच माजी नगराध्यक्ष संजय बोडखे यांच्या पत्नी अलका बोडखे यांना काँग्रेसकडून उमेदवारी मिळाली आहे. मूर्तिजापूर येथे भाजप आमदार हरिष पिंपळे यांचे भाऊ उपेंद्र नगरसेवक पदासाठी उमेदवार आहेत. वाशीममध्ये कारंजा नगर परिषदेत भाजप नेते नरेंद्र गोलेच्छा यांची सून निशा यांना उमेदवारी मिळाली. एमआयएमचे युसूफ पुंजाणी यांच्या आई फरिदाबानू व सून फिज्झा यांनाही उमेदवारी जाहीर झाली. या निवडणुकीत महायुती तसेच महाविकास आघाडीतील विविध पक्षांनी स्थानिक पातळीवर निर्णय सोपवत हात वर केले. यामुळे बुलडाण्यात महायुतीचे घटक पक्षच समोरासमोर आले. शिवसेना विरुद्ध भाजप उमेदवार समोरासमोर लढणार आहेत. उमेदवारी मागे घेतल्यानंतर लढती स्पष्ट होईल. नगरसेवक, अध्यक्ष पदासाठी विविध राजकीय पक्षांकडून कार्यकर्ते, पदाधिकारी स्पर्धेत होते. सर्वांनाच उमेदवारी मिळणे शक्य नसल्याने ऐनवेळी बंडखोरी झालेली आहे. काही जणांनी अपक्ष म्हणून उमेदवारी दाखल केली.भाजप हा पार्टी विथ ए डिफरन्स म्हणून ओळखला जात असला तरी या पक्षाची आता जवळजवळ काँग्रेसच होते आहे की काय असे चित्र दिसू लागले आहे. निवडणुकीच्या तोंडावर इथे प्रत्येक जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात इनकमिंग झाले आहे. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना या सर्वच पक्षातून इलेक्टिव्ह मेरिट असणारे जे जे बंडखोर असतील त्यांना भाजप आपल्याच सामावून घेताना दिसत आहे. त्यामुळे आता भाजपही पार्टी विथ ए डिफरन्स न राहता डिफरंट पार्टी म्हणूनच ओळखली जाईल की काय असे वाटू लागले आहे. तरीही अजूनही भाजपचे अगदी बूथ लेवलपर्यंतचे नेटवर्क भाजपच्या मदतीला येईल हे चित्र या क्षणी तरी दिसते आहे. काँग्रेसमध्ये संघटनात्मक बांधणीच्या नावाने नुसतीच बोंब आहे. प्रत्येक जण स्वतःला नेताच समजतो आहे. कुणाचा पायपोस कुणाच्या पायात नाही असे चित्र आहे. नागपुरात सुनील केदार यांच्याविरोधात प्रचंड नाराजी असून मोठ्या प्रमाणात तालुकास्तरावरचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी राजीनामे देऊन बाहेर पडलेत. अशा स्थितीत काँग्रेस आव्हान कसे पेलेल हा प्रश्नच आहे. अर्थात पक्षाच्या नेटवर्कसोबत प्रत्यक्ष उमेदवाराची समाजात असलेली प्रतिमा आणि त्याचा त्या मतदारसंघात असलेला संपर्क हा देखील कामी येईल. त्यामुळे निकाल नेमके काय लागतील हे आज सांगणे कठीण आहे. या निवडणुकीत विदर्भातील सर्वच पक्षाच्या नेत्यांची प्रतिष्ठा पणाला लागलेली आहे. विशेषतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, प्रतापराव जाधव, राज्यातील मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पंकज भोयर, अशोक उईके, आकाश फुंडकर, आशीष जयस्वाल, तसेच प्रफुल्ल पटेल, नाना पटोले, सुधीर मुनगंटीवार, विजय वडेट्टीवार, कृपाल तुमाने, प्रताप अडसड, रणजीत सावरकर, चैनसुख संचेती, अनिल देशमुख या सर्वांचेच राजकीय अस्तित्व पणाला लागले आहे. अशाही परिस्थितीत आज महाराष्ट्रात आणि केंद्रात भारतीय जनता पक्ष सत्ता स्थानी असल्यामुळे विदर्भात भाजपची हवा चांगली आहे. त्यातही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपचे ज्येष्ठ मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, अशोक उईके असे अनेक ज्येष्ठ मंत्री तसेच वरिष्ठ नेते विदर्भातीलच आहेत. त्यामुळे या क्षणी तरी विदर्भात भाजपला वातावरण अनुकूल दिसते आहे. अर्थात ज्या ठिकाणी स्थानिक उमेदवार चांगल्या प्रतिमेचा आणि चांगल्या संपर्काचा असेल त्या ठिकाणी तो कोणत्याही पक्षाचा असला तरी निवडून येण्याची संधी जास्त राहील. असेही असले तरी विदर्भात भाजप निवडून येण्याची शक्यता जास्त दिसते आहे. अर्थात या निवडणुका आहेत. अखेरच्या क्षणापर्यंत हवेचा झोत कसा येईल आणि परिस्थिती कशी बदलेल हे सांगता येत नाही. त्यामुळे निवडणूक निकाल काय लागेल हे चित्र ३ डिसेंबरलाच स्पष्ट होणार आहे.

# लोहा न.प.निवडणुक भाजपाचे प्रभाग क्रमांक ५ चे उमेदवार बबनराव निर्मले व सौ.प्रभावती गजानन गुंठे यांचा प्रचाराचा नारळ फोडला; मतदारांचा प्रचंड प्रतिसाद

**दैनिक वादळ वार्ता**
**लोहा । राजकुमार पिल्लोळे**

लोहा नगर परिषद निवडणुकीसाठी प्रभाग क्रमांक ५ अ चे भारतीय जनता पार्टी चे बबनराव निर्मले व ब च्या उमेदवार प्रभावती गजानन गुंठे यांनी दि. २२ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रचाराचा नारळ फोडला असुन त्यांच्या प्रचार रॅलीस मतदारांचा प्रचंड प्रमाणात प्रतिसाद मिळाला आहे.

लोहा शहरात नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून प्रत्येक प्रभागात निवडणुकीचा प्रचार सुरू झाला यात भारतीय जनता पार्टीचे प्रभाग क्रमांक ५ अ चे उमेदवार बबनराव निर्मले व ब च्या उमेदवार सौ.प्रभावती गजानन गुंठे -कराडे यांनी दि. २२ नोव्हेंबर रोजी त्यांच्या प्रचाराचा नारळ फोडून प्रभागात रॅली काढून मतदारांच्या गाठीभेटी घेतल्या व त्यांच्याशी संवाद साधुन भाजपाला मतदान करण्याचे आवाहन केले असता त्यांच्या रॅलीला मतदाराचा प्रचंड प्रमाणात प्रतिसाद मिळाला.

त्यानंतर कॉर्नर बैठक घेण्यात आली.



यावेळी भाजपाचे प्रभाग क्रमांक ५ अ चे उमेदवार बबनराव निर्मले, ब च्या उमेदवार सौ.प्रभावती गजानन गुंठे -कराडे ,मा. नगरसेविका सौ. शारदाताई बबनराव निर्मले, गजानन गुंठे -कराडे , संग्राम मामा पंदलवाड, विलास सावळे,यशपाल निर्मले, शिवाजी आवटे,पिराजी डिकळे, नरसिंग भाऊ बुडगुळे, मोहन गुंठे , पांडुरंग मामा घनचक्कर, सदाशिव कदम, सलीम शेख , हुसेन खाँ पठाण,बालाजी कळसकर, रुक्माजी गुंठे, बाबुखॉ पठाण, चंद्रकांत गुंठे, गजू आवळे, राजू जोशी, निलेश देशमाने, कासिम कुरेशी, राजेश पेठकर, सुरेश चव्हाण , अंकुश कटवड,यांच्यासह प्रभागातील नागरिक, महिला भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**प्रभाग क्रमांक ५ च्या विकासासाठी भाजपाला विजयी करा -- बबनराव निर्मले**

यावेळी बोलताना भाजपाचे प्रभाग क्रमांक ५ चे उमेदवार बबनराव निर्मले म्हणाले की, प्रभाग क्रमांक ५ च्या विकासासाठी भाजपाला विजयी करा. मी प्रभाग क्रमांक ५ मधील इंदिरानगर च्या जनतेच्या आशिर्वादाने इंदिरानगरचा सार्वेगिन विकास केला आहे. येथे रस्ते , वीज, पाणीपुरवठा या मुलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्यात १७०० माता भगिनींना , वयोवृद्ध जेष्ठ नागरिकांना श्रावण बाळ, निराधार योजनेचा लाभ मिळवून दिला. आमचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार व तात्कालीन नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी यांच्या माध्यमातून इंदिरानगर मध्ये कोट्यवधीचे सिमेंट रस्त्याचे कामे केली. केंद्रातील पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकार, राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व जिल्ह्यात माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात विकास होत आहे. आता आपल्याला इंदिरानगरच्या व लोहा शहरांच्या विकासासाठी भारतीय जनता पार्टी चे नगराध्यक्षपदाचे उमेदवार गजानन सुर्यवंशी, प्रभाग क्रमांक ५ अ चे उमेदवार मी बबनराव निर्मले व ५ ब च्या उमेदवार सौ. प्रभावती गजानन गुंठे यांना विजयी करा अशी विनंती बबनराव निर्मले यांनी केली.

# पुण्याहून दिवेआगर कोकणात येणाऱ्या पर्यटकांची थार

## ताम्हाणी घाटातील खोल दरीत कोसळली, सहा जणांचा मृत्यू

**दैनिक राज आनंद । बोरघर / माणगाव**
**(विश्वास गायकवाड)**

पुणे येथील सहा जीवलग मित्र थार मधून कोकणातील दिवेआगर येथे पर्यटनासाठी निघाले होते. वाटेत ताम्हिणी घाटातील एका अवघड वळणावर त्यांच्या वाहनाचे नियंत्रण सुटले आणि त्यांची थार तब्बल पाचशे फूट खोल दरीत कोसळली आणि भीषण अपघात झाला या अपघातात थार चा अक्षरशः चेंदामेंदा होऊन सहा जणांचा मृत्यू झाला. या बाबत माणगांव पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं.२८३/२०२५ भा. न्या. संहिता २०२३ चे कलम १०६,१२५(अ),१२५ (ब), २८१ सह मोटार वाहन अधिनियम १९८८ चे कलम १८४ हा गुन्हा दि. १७ नोव्हेंबर रोजीचे रात्री ११.३० वा. पासुन दि.२० नोव्हेंबर रोजी सकाळी ०९.०० वा.चे सुमारास घडलेला असुन दि.२० नोव्हेंबर रोजी १७.२२ वाजता दाखल आहे.

सदर गुन्हयातील फिर्यादी विशाल सादु गोठे वय २८ वर्ष, व्यवसाय रिक्षा चालक रा. कोपरेगाव, उत्तमनगर, शिवणे, ता. हवेली, जि.पुणे यांचा भाउ साहील सादु गोठे वय- २४ वर्ष, व त्याचे सोबतचे मित्र २) पुनित सुधाकर शेट्टी वय २० वर्ष, ३) ओमकार सुनिल कोळी वय- १८ वर्ष, ४) शिवा अरूण माने वय १९ वर्ष, ५) महादेव कोळी, वय १८ वर्षे सर्व रा. कोपरेगांव, उत्तमनगर, शिवणे ता. हवेली जि.पुणे असे दिनांक १७ नोव्हेंबर रोजी रात्री ११.३० वाजताचे सुमारास महिद्रा थार गाडी नंबर एमएच १२/वाय एन ८००४ ने कोपरेगाव जि.पुणे येथुन कोकणामध्ये



दिवेआगर येथे फिरण्यासाठी निघाले होते. त्यानंतर दिनांक १८ नोव्हेंबर रोजीचे सकाळपासुन फिर्यादी यांचे घरातील लोकांनी तसेच मयताचे नातेवाईकांनी त्यांचे मोबाईलवर संपर्क साधला असता सदर गुन्हयातील मयताचे दिनांक. १८ नोव्हेंबर रोजीचे रात्री १२.०० वाजेपर्यंत त्यांचे मोबाईलवर कॉल लागत होते. त्यानंतर यांतील मयताचे फोन लागत नसल्याने मयताचे नातेवाईक यांना त्यांचे विषयी चिंता लागलेली असल्याने फिर्यादी व मयताचे नातेवाईक मित्र परिवार असे दिनांक १९ नोव्हेंबर रोजी पहाटे ०१.०० वाजता कोपरेगाव पुणे येथुन फिर्यादी व त्यांचे मित्र परिवार त्यांचे सोबतचे मित्रांचा शोध घेण्यासाठी निघाले. त्यांनी ताम्हीणी घाट मार्गे त्यांचा शोध घेत रस्त्याचे आजुबाजुला पाहणी करीत पहाटे ०४.०० वाजेपर्यंत विळेभागाड एमआयडीसी पर्यत आले. परंतु रात्रीची वेळ असल्याने फिर्यादी व सोबतचे लोकांना फिर्यादी यांचा भाउ व त्याचेसोबतचे लोक व त्यांनी आणलेली थार गाडी दिसुन आली नाही. त्यानंतर ते माणगांव मार्गे दिवेआगर येथे रस्त्याचे आजुबाजुने पाहणी करत पोहचले. तेथे गेल्यावर त्यांनी दिवेआगर बिच तसेच दिवेआगर मधील सर्व रस्ते, हॉटेल, लॉज, फॉर्महाउस या ठिकाणी जावुन साहील गोठे व त्याचे सोबतचे मित्रांचा तसेच त्यांनी आणलेल्या थार गाडीचा शोध घेतला. परंतु ते कोठेही मिळुन आले नाहीत. म्हणुन यांतील मयत प्रथम चव्हाण याचे वडील शहाजी विलास चव्हाण यांनी त्यांचा मुलगा व त्याचे पाच मित्र हे मिसींग झाले बाबत दि.१९ नोव्हेंबर रोजी उत्तम नगर पोलीस ठाणे, पुणे शहर येथे तकार नोंद केली आहे. ती मनुष्य मिसींग रजि. नं.६८/२०२५ प्रमाणे दाखल आहे.दिनांक. २० नोव्हेंबर रोजी सकाळी ०७.०० वाजल्यापासुन ताम्हीणी घाटामध्ये १) रेस्क्यु चॅरीटेबल ट्रस्ट पुणे, २) शेलार मामा रेस्क्यु टीम माणगाव ३) डतठडड रेस्क्यु टीम, कोलाड ४) साळुंखे रेस्क्यु टीम माणगाव तसेच माणगाव पोलीस ठाणे यांचे मदतीने व ड्रोन कॅमेराद्वारे यांतील मयतांचा व थार गाडीचा शोध घेतला असता सकाळी ०९.०० वाजण्याचे सुमारास ताम्हीणी घाटातील खोल दरीमध्ये मौजे सणसवाडी गांवचे हद्दीत झाडी झुडपात थार गाडी व मयतांचे सहा प्रेत मिळुन आल्याने मयताचे नातेवाईक यांना सदर प्रेत दाखविले. त्यांनी सदरचे प्रेत ओळखुन ते १) साहील सादु गोठे वय २४ वर्ष, २) प्रथम शहाजी चव्हाण वय-२२ वर्ष, ३) पुनित सुधाकर शेट्टी वय २० वर्ष, ४) ओमकार सुनिल कोळी वय १८ वर्ष, ५) शिवा अरूण माने वय १९ वर्ष, ६) महादेव कोळी, वय १८ वर्षे सर्व रा. कोपरेगांव शिवणे ता. हवेली जि. पुणे यांचे प्रेत असल्याचे ओळखले आहेत.सदरची कामगिरी .श्रीमती आंचल दलाल मॅडम, पोलीस अधिक्षक, मा.श्री. अभिजित शिवथरे , मा.अपर पोलीस अधिक्षक रायगड, . पुष्कराज सुर्यवंशी उपविभागीय पोलीस अधिकारी माणगांव विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. निवृत्ती बो-हाडे पोलीस निरीक्षक, सपोनि/. भैरु जाधव, मसपोनि/श्रीमती लाड, पोहवा/११०० वर्तक, पोहवा /१०१८ सानप, पोह/१५९९ शिंदे, पोशि/ २४०० तांदळे, पोह/१३३२ गायकवाड, पोह/११७४ तुणतुणे, पोशि/१३१२ रणवीर, पोशि/१२५० बांडे सर्व नेमणुक माणगांव पोलीस ठाणे यांनी केलेली आहे. सदर गुन्हयाचा तपास सपोनि . जाधव हे करीत आहेत.

# डॉ.एस.बी.निमसे विद्यार्थ्यांचे प्रेरणास्रोत-डॉ.सुप्रभा कुलकर्णी

**दैनिक वादळ वार्ता । अहिल्यानगर । प्रतिनिधी**

जिल्हा मराठा विद्या प्रसारक मंडळाच्या न्यू आर्टस कॉमर्स अॅन्ड सायन्स महाविद्यालयाचे माजी प्राचार्य व नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एस. बी. उर्फ सर्जेराव निमसे हे गणित विषयाच्या सर्व विद्यार्थ्यांचे प्रेरणास्त्रोत आहेत. गणित शिकविण्याबरोबरच विद्यार्थ्यांना कोणत्याही स्वरुपाच्या येणार्या अडचणी सोडविण्यासाठी त्यांचा कायमच पुढाकार असतो. त्यामुळे विद्यार्थ्यांना ते पितृतुल्य वाटतात, असे प्रतिपादन येथील पेमराज सारडा महाविद्यालयाच्या गणित विभाग प्रमुख प्रा. डॉ. सुप्रभा कुलकर्णी यांनी नुकतेच केले.जिल्हा मराठा विद्या प्रसारक मंडळाच्या न्यू आर्टस कॉमर्स अॅन्ड सायन्स महाविद्यालयाचे माजी प्राचार्य व नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ व लखनौ विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एस. बी. उर्फ सर्जेराव निमसे यांचा अमृतमहोत्सव गणित माजी विद्यार्थी संघाच्यावतीने नुकताच यशवंतराव चव्हाण सहकार सभागृहात संपन्न झाला, त्यावेळी निमसे सरांच्या व्यक्तिमत्वाविषयी विद्यार्थ्यांच्यावतीने बोलताना त्यांनी वरील मत व्यक्त केले.

यावेळी व्यासपीठावर रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व जाणते नेते शरद पवार, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू डॉ. निंबा कृष्ण ठाकरे, इतर सतरा विद्यापीठांचे कुलगुरू, परदेशातील बरेचसे गणितज्ञ विराजमान होते. सरांच्या मार्गदर्शनाखाली पीएचडीप्राप्त अनेक विद्यार्थी तसेच न्यू आर्टस्, कॉमर्स अॅंड सायन्स महाविद्यालयातून शिक्षण घेतलेल्या दोनशेवर विद्यार्थ्यांची कार्यक्रमास उपस्थिती होती.




या कार्यक्रमात प्रा. डॉ. सुप्रभा कुलकर्णी म्हणाल्या, प्रा. निमसे सर्व विद्यार्थ्यांचे प्रेरणास्रोत आहेत. विद्यार्थीदशेत वेगवेगळ्या कारणांमुळे विद्यार्थ्यांना येणार्या अडचणी दूर करण्यासाठी ते नेहमीच प्रयत्नशील असत. पदवी शिक्षण चालू असताना काही विद्यार्थिनींचे लग्न होते. अशा विद्यार्थिनींची घर आणि शिक्षण अशी तारेवरची कसरत होते. अशा विद्यार्थिनींचे शिक्षण अर्धवट राहू नये यासाठी ते नेहमी प्रयत्न करीत. विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी रात्रीपर्यंत वर्गखोल्या वापरण्यास देणं हे सरांच्या निर्णायक व्यक्तिमत्त्वाचे द्योतक होय.प्रा. डॉ. कुलकर्णी पुढे म्हणाल्या, निमसे सर हे पितृतुल्य व्यक्तिमत्त्व आहेत. एखाद्यावर कोणतीही जबाबदारी टाकली तर सर नेहमीच त्याच्यावर पूर्ण विश्वास दाखवतात. यामुळे ती व्यक्ती मनापासून काम करून अपेक्षित यश संपादन करते. सरांच्या व्यक्तिमत्त्वाचे वर्णन करताना त्या म्हणाल्या, सरांना कोणतीही उपमा देण्याची गरज नाही. अशी कोण तीही उपमा सरांचे व्यक्तिमत्त्व पूर्ण दाखवू शकत नाही. गणित विभागातील त्यावेळच्या प्राध्यापकांची तुलना त्यांनी दत्तमूर्तीशी केली. तत्कालीन चारही प्राध्यापक एकदिलाने काम करीत असत, असे त्यांनी यावेळी सांगितले.

# राष्ट्रवादीला नांदेड जिल्ह्यात नंबर वन करण्यासाठी कार्यकर्त्यांने रणशिंग फुंकले पाहिजे-आमदार प्रताप पाटील चिखलीकर

## बरबडा येथे जिल्हा परिषद,पंचायत समिती निवडणूक संदर्भात सहविचार सभा संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**नायगाव । हनुमंत चंदनकर**

नांदेड जिल्ह्यात राष्ट्रवादीला नंबर वन करायचं असेल तर प्रत्येक कार्यकर्त्यांने घराघरात प्रचार करत रणशिंग फुंकले पाहिजे. मेहनत केली तर नगर पालिका जिल्हा परिषद – पंचायत समिती निवडणुकांमध्ये राष्ट्रवादीचे वर्चस्व अटळ आहे, असे ठाम प्रतिपादन आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी अध्यक्षस्थानावरून बोलताना व्यक्त करत कार्यकर्त्यांमध्ये नवीन ऊर्जा संचारली.नायगाव तालुक्यातील बरबडा येथे दिनांक २० नोव्हेंबर २०२५ रोजी सायं. ६ वा. राष्ट्रवादी कॉंग्रेस अजितदादा पवार गटाच्या वतीने जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसंदर्भात सहविचार सभेचे भव्य आयोजन करण्यात आले. दिलीपराव धर्माधिकारी व सौ. छायाताई दिलीपराव धर्माधिकारी बरबडेकर यांच्या पुढाकाराने सभेचे नियोजन करण्यात आले होते. बैठकीस प्रमुख मार्गदर्शक म्हणून मा. खा. भास्करराव पाटील खतगावकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती.

माजी खा खतगावकर यांनी आपले विचार मांडताना सर्व समाजाला घेऊन चालणारा पक्ष राष्ट्रवादी असून या साठी मुस्लिम समाजा सह सर्वांनी आपली शक्ती राष्ट्रवादी च्या मागे आपली उभी करावी असे विचार मांडलेसभेला जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर यांचे बंधू दत्तू पाटील, मुक्तेश्वर धोंडगे, प्रदेश सरचिटणीस वसंत पाटिल सुगावे, मनोहर पाटील भोसीकर,डॉ उद्धव सोनकांबळे,बाबुराव कदम, बालाजी पाटील कदम सोमठाणकर, बालाजी पाटील नागोलीकर, शिवचंद्र डांगे, हौसाजी पाटील शिंदे, तालुकाध्यक्ष अंकुश हांनमंते, विश्वनाथ बडूरे,सुनंदा ताई जोगदंड ताई, पाटील ताई, पापटवार ताई, प्रा. प्रभाकर पवार, डॉ.जीवन चव्हाण, आदी मान्यवरांची उपस्थिती होती.



मनोगत व्यक्त करताना दिलीपराव धर्माधिकारी व वसंत सुगावे यांनी सौभाग्यवतीसाठी उमेदवारीची मागणी करीत, उमेदवारी मिळाल्यास पूर्ण ताकदीने व प्रामाणिकपणे पक्षाच्या विजयासाठी काम करू, असा ठाम विश्वास व्यक्त केला.यावेळी दमदार प्रास्ताविक यातून इतिहास मांडत शिवाजीराव धर्माधिकारी,व सुदर्शन धर्माधिकारी यांनी आपल्या भावना टाळ्याच्या गजरात व्यक्त केल्या

कार्यक्रमाला नायगाव तालुक्यातील व बरबडा सर्कलमधील राष्ट्रवादी कॉंग्रेसवर प्रेम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा आणि नागरिकांचा मोठा जमाव उपस्थित होता. सौ. छायाताई दिलीपराव धर्माधिकारी बरबडेकर यांना बरबडा जिल्हा परिषद उमेदवारी देण्याची मागणी एकमुखाने करण्यात आली.

सभेतील मोठी गर्दी,सौ छायाताई धर्माधिकारी यांच्या उमेदवारीची चर्चा आणि चिखलीकर यांच्या दमदार आमदार राजेश पवार यांच्या एकाधिकारशाही चा समाचार घेणाऱ्या विरोधातील भाषणामुळे बरबडा परिसरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, आगामी निवडणुकीत बरबड्यातून राष्ट्रवादी कॉंग्रेसचा झेंडा अधिक उंच फडकवण्याचा निर्धार कार्यकर्त्यांनी व्यक्त केला. नागोराव तीप्पलवाड यांनी संचलन व आभार मानले

# लोह्यात राष्ट्रवादी कॉंग्रेस ला खिंडार युवानेते मा.नगरसेवक जीवन पाटील चव्हाण यांच्यासह अनेकांचा भाजपा मध्ये प्रवेश

दैनिक वादळ वार्ता

**लोहा । राजकुमार पिल्लोळे**

लोहा शहरात लोहा न.प. च्या रणधुमाळीतच राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी(अजित पवार गट)ला मोठे खिंडार पडले असुन राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे युवानेते मा. नगरसेवक प्र. जीवन पाटील चव्हाण यांनी दि. २१ नोव्हेंबर रोजी भाजपाचे प्रदेश प्रवक्ते व भाजपाचे लोहा न.प. चे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार तथा मा. नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी यांच्या प्रमुख उपस्थितीत आपल्या अनेक समर्थकासहित भाजपा मध्ये जाहीर प्रवेश केला असल्यामुळे राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीला ऐन निवडणुकीच्या तोंडावर मोठे खिंडार पडले आहे.



सध्या लोहा शहरात नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीची रणधुमाळी चालू असुन यात अनेक नाराजजण हे पक्षाने तिकीट दिले नसल्यामुळे पक्षांतर करीत आहेत यात राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (अजित पवार गट) ला लोहा शहरात धक्क्यावर धक्के बसत असुन लोहा शहरातील प्रभाग क्रमांक १ चे नगरसेवक प्र. जीवन पाटील चव्हाण यांनी २०२४ च्या विधानसभेच्या निवडणुकीच्या पुर्वी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्यावर विश्वास ठेऊन राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी मध्ये प्रवेश करुन करुन विधानसभेच्या निवडणुकीत त्यांचे काम केले पण आता लोहा न.प. च्या निवडणुकीत राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीने त्यांना डावलल्यामुळे त्यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीला सोडचिठ्ठी देत दि.२१ नोव्हेंबर रोजी भाजपाचे प्रदेश प्रवक्ते एकनाथ दादा पवार, भाजपाचे लोहा न.प.चे उमेदवार गजानन सुर्यवंशी यांच्या प्रमुख उपस्थितीत भाजपमध्ये आपल्या समर्थकांसह जाहीर प्रवेश केला. तसेच यावेळी नगरसेवक प्र.जीवन पाटील चव्हाण यांच्या सह त्यांचे समर्थक विजय पाटील चव्हाण, प्रदीप मुसळे, योगेश दामले, गौतम कांबळे, रंगनाथ पेंडूकर,माधव मोरे, शिव जाधव, संतोष पाटील, सचिन आंबुलगेकर, अनिल राठोड, विकास राठोड,आशिष चव्हाण,नंदू तेलंग, बालाजी जाधव, अप्पाराव हंकारे,विठु माने,राजू पातळे,राजू यादव, कांता डोम, संतोष जाधव, शकील शेख,राम दाढेल, नारायण कदम आदी कार्यकर्त्यांनी भाजपा मध्ये जाहीर प्रवेश केला. यावेळी भाजपाचे प्रदेश प्रवक्ते एकनाथ दादा पवार व मा.नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी यांनी जीवन पाटील चव्हाण यांच्यासहीत भाजपात प्रवेश घेतलेल्या त्यांच्या सर्व समर्थकांचे स्वागत करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. यावेळी सचिन सुर्यवंशी,किरण डोईफोडे,हनमंत लांडगे, मिलिंद पाटील पवार,केशव पाटील पवार, आशिष व्यवहारे, गजानन कराडे,संजय चव्हाण आदी उपस्थित होते. यावेळी प्रतिक्रिया देताना मा.नगरसेवक प्र. जीवन पाटील चव्हाण म्हणाले की, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी धोकेबाज आहे. प्रविण पाटील चिखलीकर यांनी शब्द पाळला नाही.मला प्रभाग क्रमांक मधुन राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे तिकीट देतो म्हणून दिले नाही. आज मी भाजपाचे प्रदेश प्रवक्ते एकनाथ दादा पवार व नगराध्यक्ष पदाचे उमेदवार गजानन सुर्यवंशी यांच्यावर विश्वास ठेऊन भारतीय जनता पार्टी मध्ये प्रवेश केला आहे. त्यांनी मला जिल्हा नियोजन समितीवर घेण्याचे आश्वासन दिले आहे.तसेच भाजपाचे ज्येष्ठ नेते राज्याचे माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्याशी फोनवरून बोलणे करून दिले त्यामुळे मी माझ्या समर्थकासह भाजपामध्ये प्रवेश केला आहे व लोह्यात भाजपा जिंकण्यासाठी आम्ही जिंकण्यासाठी प्रयत्न करणार आहोत व लोहा न.प. निवडणुकीत भाजपाचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार गजानन सुर्यवंशी यांच्यासह सदस्य पदाचे सर्व भाजपाचे उमेदवार विजयी होतील असे मा.नगरसेवक प्र.जीवन पाटील चव्हाण म्हणाले.

# सरदार १५० जिल्हा स्तरीय युनिटी पदयात्रा



दैनिक वादळ वार्ता

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जिल्हा प्रशासन आणि युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार यांच्या मेरा युवा भारत, चंद्रपूर तर्फे सरदार १५० जिल्हास्तरीय युनिटी/ पदयात्रेचे आयोजन सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर येथे करण्यात आले. कार्यक्रमाचा शुभारंभ प्रा. डॉ. गुरुदास बाल्की, एन.एस.एस. जिल्हा समन्वयक यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाला.कार्यक्रम प्रसंगी प्राचार्य प्रा. डॉ. प्रमोद काटकर, उपप्राचार्य प्रा. डॉ. माध्यमशेट्टीवार, जिल्हा युवा अधिकारी, मेरा युवा भारत सुशिल भड, कॅप्टन डॉ. सतिश कन्नाके, प्रा. डॉ. कुलदीप गोंड, एन.एस.एस. समन्वयक, मोरेश्वर गायकवाड, क्रीडा अधिकारी, समन्वयक मंगेश डुबे उपस्थित होते.उद्घाटन प्रा. डॉ. बाल्की यांनी लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचे भारत एकीकरणातील कार्य स्मरण करून युवकांना राष्ट्रीय एकता, विकास आणि सेवा यांचा संदेश दिला. पदयात्रेच्या प्रारंभी प्राचार्य प्रा. डॉ. काटकर यांच्या हस्ते राष्ट्रीय एकता दिवस शपथ, आत्मनिर्भर भारत संकल्प आणि नशामुक्ती प्रतिज्ञा उपस्थित युवक–युवतींना देण्यात आली. कार्यक्रमात देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रम, पथनाट्य यांचेही आयोजन करण्यात आले. या पदयात्रेत सरदार पटेल महाविद्यालयाच्या ५०० युवक–युवतींचा उत्स्फूर्त सहभाग होता.कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुशिल भड यांनी केले. संचालन डॉ. पुरुषोत्तम माहुरे यांनी तर आभार प्रा. डॉ. कुलदीप गोंड यांनी मानले. पदयात्रा यशस्वी करण्यासाठी सोहेल, यश आसुटकर, मारोती बोबाटे, खोमेश भड व मंगेश भट यांनी मेहनत घेतली.

# कै.सौ.वैशालीताई मनोहर धोंडे यांचे प्रथम पुण्यस्मरण आणि शिवलिंग प्राणप्रतिष्ठा सोहळा दि.२४ नोव्हेंबर रोजी

दैनिक वादळ वार्ता

**लोहा । राजकुमार पिल्लोळे**

शिवा संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे यांच्या सुविद्य पत्नी *कै. सौ. वैशालीताई मनोहर धोंडे* यांचे निधन गुरुवार दि. ५ डिसेंबर २०२४ (मार्गशीर्ष शुद्ध ४, शके १९४६) रोजी पहाटे १.०५ वाजता देवाज्ञा झाली होती. तिथीनुसार त्यांचा *प्रथम पुण्यस्मरण दिवस सोमवार दि. २४ नोव्हेंबर २०२५ रोजी (मार्गशीर्ष शुद्ध ४, शके १९४७) आहे. या निमित्ताने शिवा स्मृती मंदिर, मौजे *शेवडी (बा)* येथे दिनांक २४ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता* धोंडे सर यांच्या कुटुंबीयांचे कुळगुरू *आदरणीय गुरुवर्य शंभुलिंग शिवाचार्य महाराज उदगीरकर यांच्या शुभहस्ते *शिवलिंग प्राणप्रतिष्ठापना* करण्यात येणार आहे.



या कार्यक्रमानिमित्त शिवा राष्ट्रीय भूषण पुरस्कार* प्राप्त शिवकिर्तनकार *शि.भ.प. श्री शिवशरण गुरुजी रटकलकर* यांचे सुश्राव्य शिवकिर्तन तसेच उपस्थित गुरुवर्यांचे आशीर्वचन व भोजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

उपस्थित राहणारे गुरुवर्य

गुरुवर्य शंभुलिंग शिवाचार्य महाराज उदगीरकर

गुरुवर्य सोमलिंग शिवाचार्य महाराज बिचकुंदेकर

गुरुवर्य शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर

गुरुवर्य राजशेखर शिवाचार्य महाराज अहमदपुरकर

गुरुवर्य दिगंबर शिवाचार्य महाराज वसमतकर

गुरुवर्य सिद्धचैतन्य शिवाचार्य महाराज साखरखेडकर

गुरुवर्य विरुपाक्ष शिवाचार्य महाराज मानुरकर

गुरुवर्य प्रभुदेव शिवाचार्य महाराज माढेकर

गुरुवर्य राचलिंग शिवाचार्य महाराज परांडकर

गुरुवर्य सिद्धदयाळ शिवाचार्य महाराज बेटमोगरेकर

गुरुवर्य शंभुलिंग शिवाचार्य महाराज आंबेजोगाईकर

गुरुवर्य महादेव शिवाचार्य महाराज कळमनुरीकर

गुरुवर्य शंकरलिंग शिवाचार्य महाराज शिरूर अनंतपालकर

गुरुवर्य संगमबसव शिवाचार्य महाराज निलंगेकर

गुरुवर्य शिवलिंग शिवाचार्य महाराज उजनेकर

आचार्य गुरुराज स्वामी, भक्तीस्थळ अहमदपुरकर

वरील सर्व गुरुवर्यांचे आशीर्वाद या प्रसंगी लाभणार आहेत.तरी सर्व *पदाधिकारी, कार्यकर्ते, समाजबांधव, पंचक्रोशीतील ग्रामस्थ, पाहुणे व अंतविधिला आलेल्या सर्वानी तसेच मित्रमंडळी यांनी आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन शिवा संघटनेचे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष तसेच सेवा जनशक्ती पक्षाचे पक्षप्रमुख **प्रा. मनोहर धोंडे* आणि *संपूर्ण धोंडे परिवार, शेवडी (बा)* यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# दिव्यात शाळेसमोरील रस्ता दुभाजक हटविण्यासाठी चक्काजाम आंदोलन

दैनिक वादळ वार्ता

**ठाणे । प्रतिनिधी**

दिवा शहरातील दिवा–आगासन या मुख्य रस्त्यावरील आर एन विद्यालयासमोरील रस्ता दुभाजक तात्काळ हटविण्यासाठी शाळा प्रशासनाने ठाणे मनपा व ठाणे शहर वाहतूक विभागाला सन २०२२ पासून अनेक निवेदने देण्यात आली असताना देखील अनेकवेळा पाठपुरावा करूनही प्रशासन निर्णय घेत नसल्याने मेस्टा संघटनेच्या वतीने आज आर एन महाविद्यालयासमोर रस्त्यावर चक्काजाम आंदोलन करण्यात आले. सदर शाळेसमोर रस्ता दुभाजक असल्याने विध्यार्थी वाहतूक रिक्षा व बस यांना अनेक अडचनींना सामोरे जावे लागत असल्याने वाहतूक कोंडी होत असते तर काही विध्यार्थी रस्ता दुभाजकावर चढून रस्ता ओलांडतात त्यामुळे अनेकदा आपघात झाले आहेत. सदर महाविद्यालयात जवळपास तीन हजारांच्या आसपास शालेय विद्यार्थी व विदयार्थीनी शिकत असून आपघात होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. प्रशासनाला अनेकदा निवेदन देऊनही प्रशासन रस्ता दुभाजक हटवत नसल्याने आज मेस्टा संघटनेचे महाराष्ट्र अध्यक्ष नरेश पवार यांच्या मार्गदर्शनाखाली चक्काजाम आंदोलन करण्यात आले प्रसंगी मेस्टा संघटनेचे अनेक पदाधिकारी व शिक्षक उपस्थित होते. प्रसंगी आर एन महाविद्यालयाच्या संचालिका सौ. रेश्मा पवार व शाळेच्या मुख्याद्यापिका व शालेय विद्यार्थी यांनी एकत्र येऊन रस्ता रोको करण्यात आला. मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. संबंधीत प्रशासकीय अधिकारी व ठाणे शहर वाहतूक विभागाने तात्काळ रस्ता दुभाजक हटविण्याची मागणी केली. प्रसंगी वाहतूक कोंडीमुळे पोलीस प्रशासनाने व दिवा प्रभाग समितीचे सहायक आयुक्त शिवप्रसाद नागरगोजे यांनी घटनास्थळी येऊन परिस्थिती नियंत्रणात आणली व संबंधित रस्ता दुभाजक हटविण्यास सकारात्मक प्रतिसाद देऊन आंदोलन नियंत्रणात आणले.



# तळोदा भाजपच्या गोटात मोठी राजकीय स्फूर्ती! पाडवी कुटुंबाची एकी: माजी आमदार उदेसिंग यांचा भाजपला जाहीर पाठिंबा

## नगराध्यक्षपदाचे उमेदवार जितेंद्र सूर्यवंशी यांना पाडवींचा थेट आशीर्वाद; 'राजेश पाडवींना बळ देणे माझी जबाबदारी!'

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

तळोदा नगरपरिषद निवडणुकीच्या रणधुमाळीत भाजपने मोठी राजकीय चाल खेळली आहे. शहादा–तळोदा मतदारसंघाचे प्रभावशाली नेते व माजी आमदार उदेसिंग पाडवी यांनी भाजपच्या उमेदवारांना आपला जाहीर आणि निर्णायक पाठिंबा देत राजकीय क्षेत्रात मोठी खळबळ उडवून दिली आहे. त्यांनी नगराध्यक्षपदाचे उमेदवार जितेंद्र सूर्यवंशी यांच्यासह भाजपच्या सर्व नगरसेवक उमेदवारांना विजयी करण्यासाठी सक्रिय पाठिंब्याची घोषणा केली आहे. शुक्रवार, दिनांक २२ रोजी आयोजित पत्रकार परिषदेत उदेसिंग पाडवी यांनी ही महत्त्वपूर्ण भूमिका जाहीर केली. पाडवींच्या पाठिंब्यामुळे तळोद्यातील राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलली असून, त्यांच्या शब्दाला मानणारे त्यांचे सर्व निष्ठावान समर्थक आता भाजपच्या बाजूने वळणार असल्याने भाजपला मोठे बळ मिळणार आहे.

**'आम्ही सर्व कुटुंब एकत्र'; राजेश पाडवींना बळ देणार!**

यावेळी बोलताना उदेसिंग पाडवी यांनी कुटुंबातील राजकीय एकीवर जोर दिला. आता आम्ही सर्व कुटुंब एकत्र आहोत. माझा मुलगा आमदार राजेश पाडवी पुढे जात आहे. त्यामुळे त्यांना बळ देणे ही माझी प्रथम जबाबदारी आहे. त्यांच्या प्रवासाला माझा कोणताही विरोध नसेल, असे स्पष्टीकरण त्यांनी दिले. यासोबतच, तरीही, कुठे काही चुकीचं घडलं तर मी नक्कीच आवाज उठवणार, असा परखड इशारा देण्यासही ते विसरले नाहीत.

**भाजपची मोठी जबाबदारी स्वीकारण्यास तयार**

राजकीय वर्तुळात अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या चर्चांना पूर्णविराम देत, उदेसिंग पाडवी यांनी भाजपमध्ये सक्रिय होण्याची तयारी दर्शवली आहे. भविष्यात भाजपच्या वतीने मोठी जबाबदारी देण्यात आल्यास काय निर्णय घ्याल, या प्रश्नावर ते ठामपणे म्हणाले, भाजपच्या वतीने माझ्याकडे जबाबदारी देण्यात आली तर ती नाकारण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. त्यांच्या या वक्तव्यावरून ते लवकरच भाजपमध्ये सक्रिय होऊन मोठी जबाबदारी स्वीकारणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.



**धाकट्या चिरंजीवाची माघार; कुटुंबासाठी मोठा त्याग!**

या पत्रकार परिषदेला उदेसिंग पाडवी यांचे लहान चिरंजीव नितीन पाडवी यांची उपस्थिती लक्षवेधी ठरली. नितीन पाडवी तळोदा येथील प्रभाग क्रमांक १० मधून निवडणूक लढवणार होते. मात्र, आपले एकच कुटुंब आहे, आपल्याला लोकांना धरून चालावं लागेल, असे सांगत आमदार राजेश पाडवी यांच्या शब्दाखातर त्यांनी आपली उमेदवारी मागे घेतल्याचे माजी आमदारांनी सांगितले.नितीन पाडवी यांना भविष्यात संधी मिळणार का, या प्रश्नावर उदयसिंग पाडवी म्हणाले, जर तळोदा नगरपरिषदेत भाजपची सत्ता आली, तर आमदार राजेश पाडवी यांनी नितीनला स्वीकृत नगरसेवक म्हणून घेतले जाईल, असा शब्द मला दिला आहे. यावेळी पत्रकार परिषदेत माजी आमदार उदयसिंग पाडवी यांच्यासोबत भाजपचे शहराध्यक्ष गौरव वाणी, नगराध्यक्षपदाचे उमेदवार जितेंद्र सूर्यवंशी आणि नितीन पाडवी हे उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांमध्ये श्वान निद्रा व काक दृष्टी असावी-ॲड.उद्धवराव कराड

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

दि.२२ नोव्हेंबर २०२५ रोजी साने गुरुजी निवासी विद्यालयामध्ये माध्यमिक विभागाच्या मुलांसाठी सर्जनशील विचार व मूल्य वर्धन यावर मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून बीड जिल्हा ऊसतोड कामगार विकास मंडळ केज चे संस्था अध्यक्ष अड.श्री. उद्धवरावजी कराड मार्गदर्शन करताना म्हणाले की,विद्यार्थी यांच्याकडे शिक्षण घेत असताना श्वान निद्रा व काक दृष्टी असणे अत्यंत महत्त्वाचे आहे.त्याच बरोबर हक्क आणि कर्तव्य याची तुलनाकरून जेवढे आपण हक्कासाठी जागरूक आहोत. तेवढ्याच पद्धतीने कर्तव्याची देखील जाण निर्माण व्हायला पाहिजे. शाळा महाविद्यालयातून आणि पुस्तकांमधून आपणास हक्क तर शिकवली जातात मात्र कर्तव्य अशी स्पष्टपणे कोणी शिकवत नाही. त्यामुळे हळूहळू आपण कर्तव्याकडे दुर्लक्ष करत जातो आणि केवळ हक्का विषयी भांडखोर वृत्ती निर्माण करतो.ज्या पद्धतीने भारतीय राज्य घटनेने स्वातंत्रासारखा भारतीयांना हक्क दिला पण स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे.आपल्याला थोर समाज सुधारक आणि साधुसंतांच्या आचार विचारातून मूल्य आत्मसात करावी लागतात.यासाठी चिकित्सक वृत्ती असावी लागते.ज्यामुळे समाजा मध्ये ज्या चांगल्या वाईट घटना घडतात यांच्यामध्ये प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या आपण सहभागी झालो नाही तरी केवळ मूक संमतीने देखील चांगल्या वाईट गोष्टी निमुटपणे सहन केल्याने आपल्या व्यक्तिमत्त्वावर परिणाम होतो. व्यक्ती आणि व्यक्तीचे मन हे दोन्ही एकमेकावर अवलंबून असतात स्वामी विवेकानंद असे म्हणतात की,माणसाला जे शारीरिक,मानसिक, सामाजिक घटक दुर्बल बनवणार आहे त्याचा विषयाप्रमाणे त्याग करा. म्हणजे आपल्याला समाजामध्ये एक चांगला माणूस म्हणून जगताना आनंद होईल.आनंद हा स्वतःच्या




सुखदुःखावर अवलंबून नसतो किंवा काही वेळा अवलंबून असला तरी तो शाश्वत नाही इतरांच्या सुखदुःखा वर आपलं सुख मानणारा व्यक्ती निर्माण होणे आवश्यक आहे.डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी असे म्हटले आहे की, आपण कोणत्याही जाती मध्ये जन्माला आले असाल,कोणत्याही लिंगा मध्ये जन्माला आलेले असाल किंवा शारीरिक व्यंग असाल तरी त्यावर मात करण्याचे एकमेव साधन म्हणजे शिक्षण होय आणि म्हणून शिक्षण घेताना आपण सर्जन शीलता वृद्धिंगत केली पाहिजे त्याकरिता आपले मित्र किंवा विचार सतत चांगले असायला हवेत. संत एकनाथ महाराजांनी म्हटल्यानुसार ढेकुनाच्या संगे हिरा ही दुभंगला त्याचप्रमाणे तुम्ही तुमच्या आई वडिलांसाठी,शाळे साठी उद्याच्या भावी भारतासाठी अमूल्य आहात मात्र याला वाईट संगती आणि अविवेकी विचार यांचा सहवास घडल्यास आपण कमकुवत आणि ठिसूळ बनू थोडक्यात आपण मुल्य हीन बनू आणि म्हणून मूल्यशिक्षण व चिकित्सक विचार महत्त्वाचा आहे.यावेळी अध्यक्षस्थानी शाळेच्या प्राचार्या डॉ.कविता गीते मॅडम वरिष्ठ सहशिक्षक श्री.मोती सर,जे एन एम कॉलेजचे प्राचार्य नेहरकर सर उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती कांदे मॅडम यांनी तर आभारप्रदर्शन श्रीमती वडमारे मॅडम यांनी मांडले कार्यक्रम यशस्वी करण्या साठी विभाग प्रमुख दस्तुरे सर यांनी अथक परिश्रम घेतले.

# भारतीय जनता मजदूर संघाकडून चार श्रम संहितांच्या ऐतिहासिक अंमलबजावणी बाबत भारत सरकारचे स्वागत-शांतप्रकाशजी जाधव

**दैनिक वादळ वार्ता**
**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

भारत सरकारने दि.२१ नोव्हेंबर २०२५ पासून देशभरात चार श्रम संहितांची अंमलबजावणी करण्याचा घेतलेला ऐतिहासिक निर्णयाचे भारतीय जनता मजदूर संघाने (इगचड) उत्साहाने स्वागत केले आहे.भारतीय जनता मजदुर संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री.शांतप्रकाशजी जाटव यांनी पत्रकारांशी बोलताना सरकारचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.



या चार श्रम संहितांमध्ये
१.वेतन संहिता २०१९, २.औद्योगिक संबंध संहिता २०२०, ३.सामाजिक सुरक्षा संहिता २०२० आणि ४.व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य व कार्यपरिस्थिती संहिता २०२० यांचा समावेश आहे.शांत प्रकाश जाटव यांनी सांगितले की,या संहितां मुळे देशातील कोटयवधी कामगारांच्या जीवन मानात वास्तविक सुधारणा घडणार असून श्रमिक संरक्षण, पारदर्शक वेतनव्यवस्था ,सामाजिक सुरक्षा आणि सुरक्षित कामकाजाचे वातावरण निर्माण होणार आहे.

**ऐतिहासिक आणि श्रमिक हिताचे पाऊल श्री शांत प्रकाशजी जाटव**

सरकारच्या निर्णयाचे कौतुक करताना श्री. शांतप्रकाशजी जाटव म्हणाले की,चारही श्रम संहितांच्या अंमलबजावणी नंतर देशाचा संपूर्ण श्रम तंत्र अधिक आधुनिक,सुरक्षित आणि पारदर्शक बनले आहे.गिग वर्कर, प्लॅटफॉर्म वर्कर, महिला,युवक आणि असंघटित क्षेत्रातील कामगारांना पहिल्यांदाच वास्तविक सामाजिक सुरक्षा मिळू लागेल.हा निर्णय न्यायपूर्ण श्रम व्यवस्थेच्या दिशेने मोठा टप्पा आहे.

**संहितांमुळे होणारे प्रमुख लाभ**

देशातील सर्व कामगारां साठी किमान वेतनाची हमी,नियुक्ती पत्र अनिवार्य, पारदर्शकतेला चालना,गिग व प्लॅटफॉर्म वर्करांना प्रथमच सामाजिक सुरक्षा मिळणार आहे,महिलांना सुरक्षिततेसह रात्रीच्या पाळीत कामाची संधी,सर्व कर्मचाऱ्यांसाठी वार्षिक मोफत आरोग्य तपासणी,देशभरात ESIC कव्हरेजचा विस्तार, वेळेवर वेतन देणे बंधन कारक असणार आहे, कंत्राटी श्रमिकांनाही समान सुरक्षा,उद्योगां साठी सिंगल रजिस्ट्रेशन आणि सिंगल लायसन्स मुळे सुलभ अनुपालन होणार आहे.

**भारतीय जनता मजदुर संघाचा जागरूकता अभियानाचा संकल्प**

नवीन संहितांची माहिती देशातील प्रत्येक कामगारापर्यंत पोहोंचावी यासाठी भारतीय जनता मजदूर संघ देशव्यापी जन जागृती मोहीम राबवणार आहे असे श्री.शांत प्रकाश जी जाटव यांनी सांगितले. संगठित किंवा असंघटित सर्वच क्षेत्रांतील कामगारांना त्यांच्या नवीन हक्कांची जाणीव करून देणे हा आमचा संकल्प आहे.आत्मनिर्भर भारताच्या दिशेने हे पाऊल महत्त्वाचे आहे असे त्यांनी सांगितले.केंद्र सरकारच्या या निर्णयाचे भारतीय जनता मजदुर संघाचे राष्ट्रीय सचिव भाऊसाहेब घोडके, महाराष्ट्र राज्य सचिव धनंजय कुलकर्णी, मराठवाडा सचिव चंद्रकांत पाटील यांनी स्वागत केले आहे.व भारत सरकारचे आभार व्यक्त केले आहेत.

# धामणगाव महसूल पथकाने अवैध रेती वाहतुकीवर मोठी कारवाई

**दैनिक वादळ वार्ता**
**धामणगाव रेल्वे । प्रतिनिधी**

अवैध रेती वाहतुकीवर मोठी कारवाई करत एमएच २० सीटी १७३६ हा ट्रक जप्त केला. दिनांक १९ नोव्हेंबर रात्री सुमारे ९.४५ वाजता धामणगाव बायपासवरील नायरा पेट्रोल पंपाजवळ ही कारवाई करण्यात आली. तपासणीदरम्यान ट्रक चालक विलास सिदम यांच्याकडे कोणताही गौण खनिज वाहतूक परवाना आढळला नसल्याने ट्रकमधील अंदाजे ३ ब्रास रेतीसह वाहन ताब्यात घेऊन तहसील कार्यालयात पंचनामा करून जप्त करण्यात आले.

कारवाईदरम्यान ग्राम महसूल अधिकारी आकाश चव्हाण, सागर भांडवले, दिनेश ठाकरे यांची उपस्थिती होती. फिरते गौण खनिज गस्ती पथक सुरू झाल्यापासून अवैध वाहतुकीवर प्रभावी नियंत्रण येत असल्याचे अधिकारी सांगत आहेत. तहसीलदार अभय घोरपडे यांनी या अवैध रेती वाहतूक करणाऱ्या वर कठोर भूमिका घेतली



असून कोणतेही वाहन परवान्याविना आढळल्यास तत्काळ कठोर कारवाई केली जाईल. जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत धामणगाव तालुक्यातील चार रेती घाटांचा ऑनलाईन लिलाव ३ डिसेंबर रोजी होणार असून १८ ते २६ नोव्हेंबरदरम्यान अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध आहे. अधिकृत रेती उपलब्ध झाल्यानंतर अवैध वाहतुकीवर अधिक प्रभावीपणे नियंत्रण येईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# सिरसाळा येथे सहकारी पतसंस्था संचालक कर्मचारी यांचा प्रशिक्षण वर्ग संपन्न




**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित पुणे चे सहकार प्रशिक्षण केंद्र लातूर,मा.जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था बीड यांचे विद्यमाने शिरसाळा येथे नागरी, ग्रामीण सहकारी पत संस्थेचे संचालक, कर्मचारी यांच्याकरिता दोन दिवसीय प्रशिक्षण वर्ग घेण्यात आला.या कार्यक्रमाचे उद्घाटन राजश्री शाहू नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित सिरसाळा चे चेअरमन श्री.वसंत निर्मळ व प्रमाणित लेखा परीक्षक श्री.सी.ए.खोडसे साहेब यांच्या शुभ हस्ते श्री. छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. दोन दिवसीय प्रशिक्षण वर्गात सहकार प्रशिक्षण केंद्र लातूरचे उपप्राचार्य एस.आर.कोळे यांनी सहकार कायदा,नियम या विषयावर मार्गदर्शन केले. अभ्यासू मार्गदर्शक तज्ञ श्री.खोडसे सी.ए. प्रमाणित लेखा परीक्षक सहकारी संस्था बीड यांनी ठेवी सुरक्षितता,कर्ज वितरण करत असताना घ्यावयाची दक्षता, एनपीए,थकबाकी, थकबाकीदारावर १०१ ची कायदेशीर कार्यवाही, ऑडिट संदर्भात व भविष्यात ठेवीदार व संस्था अडचणीत येणार नाही याविषयी सविस्तर मोलाचे मार्गदर्शन केले तसेच श्री.विठ्ठल मुळे प्रमाणित लेखा परीक्षक यांनी संस्था अवसानात येणार नाही याविषयी घ्यावयाची दक्षता याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. समारोप प्रसंगी चेअरमन श्री.वसंत निर्मळ यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.सूत्र संचालन,आभार वर्ग संयोजक श्री.एस.आर. कोळे यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन व यशस्वी पार पाडण्यास राजश्री शाहू नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित शिरसाळा कर्मचारी,संचालक यांनी सहकार्य केले.

# आज होणार खा.बजरंग सोनवणे यांच्या हस्ते राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (श.प.) उमेदवारांच्या प्रचाराचा शुभारंभ

## प्रदेश सरचिटणीस राजेभाऊ फड आणि दीपक (नाना) देशमुख यांची प्रमुख उपस्थिती

**दैनिक वादळ वार्ता**
**परळी । प्रतिनिधी**






परळी नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाच्या उमेदवाराचा प्रचाराचा शुभारंभ राज्याच्या प्रमुख नेत्यांच्या हस्ते होणार आहे. दि. २३ नोव्हेंबर रविवारी रोजी दुपारी ठीक एक वाजता होणार असून राज्याचे प्रदेश सरचिटणीस राजेभाऊ फड, ज्येष्ठ नेते फुलचंद कराड, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाचे नेते दीपक रंगनाथ देशमुख, पक्षाचे प्रभारी डॉ. नरेंद्र काळे, ज्येष्ठ नेते प्रभाकर वाघमोडे आणि बाळासाहेब देशमुख, यांच्या प्रमुख उपस्थितीत खासदार बजरंग सोनवणे यांच्या हस्ते होणार आहे.

सर्वप्रथम हनुमान मंदिर मोंढा येथे परळी नगरपरिषद निवडणुकीच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या विकसित परळीचे संकल्प पत्र आणि श्रीफळ फोडून व त्यानंतर आझाद नगर येथील दर्ग्यास चादर अर्पण करून प्रचाराची सुरुवात होणार आहे.

या संकल्प पत्रात प्रमुख्याने सुंदर परळी स्वच्छ परळी तसेच दहशतमुक्त आणि महिला सुरक्षा यावर भर देण्यात आला असून, त्या अनुषंगाने प्रचाराच्या शुभारंभ वेळी जाहीर करण्यात येणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे नेते दीपक रंगनाथ देशमुख व नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ संध्या दीपक देशमुख यांच्या निवासस्थानापासून, गणेश पार येथून या प्रचार रॅली सुरुवात होणार आहे, पुढे ही रॅली राणी लक्ष्मीबाई टॉवर, मोंढा मार्केट, एक मिनार चौका मार्गे, स्टेशन रोड भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन, तसेच, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास अभिवादन करून शिवाजी चौकातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन करून, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहरातील मुख्य कार्यालय येथे समारोप होणार आहे. तरी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी व नेते कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने बाबा शिंदे, जेष्ठ नेते उत्तम माने, अड. जिवनराव देशमुख ,शंकर शेजुळ, मुन्ना काळे, सय्यद फिरोज ,वर्षा रायभोळे कल्पना देशमुख, अक्षय सोनवणे, प्रकाश देशमुख आदी शहर व पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्याकडून कडुन करण्यात आले आहे.

# परळी शहरात जल्लोष; प्रा.टी.पी.मुंडे यांची शिवसेना शिंदे गटाच्या बीड जिल्हा संपर्कप्रमुखपदी निवड!

**दैनिक वादळ वार्ता**
**परळी । प्रतिनिधी**

शिवसेना (शिंदे गट) बीड जिल्ह्यातील अनुभवी नेते प्रा. टी.पी. मुंडे यांची बीड जिल्हा संपर्कप्रमुखपदी निवड झाल्याने परळी शहरात आनंदाची लाट उसळली आहे. शिवसेनाप्रमुख हिंदुहृदय सम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या आशीर्वादाने व महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख मा. एकनाथ शिंदे साहेब यांच्या आदेशाने ही निवड जाहीर करण्यात आली. निवड जाहीर होताच शहरातील शिवाजी चौक, आझाद चौक, नेहरू चौक, मोंढा मार्केट आणि त्यांच्या संपर्क कार्यालयासमोर कार्यकर्त्यांकडून फटाके फोडून भव्य जल्लोष करण्यात आला.



प्रा. मुंडे यांनी आपल्या निवडीबद्दल मा. एकनाथ शिंदे साहेबांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले, तसेच पक्ष संघटन अधिक बळकट करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले.या निमित्ताने बीड जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, तालुकाप्रमुख व्यंकटेश शिंदे, शिवसेना नेते राजा भैय्या पांडे आणि शहर प्रमुख वैजनाथ माने, विनायक गडदे, रवींद्र पापा गीते,इंद्रुबा दहिफळे ,प्रदीप भैय्या (बबलू शेठ) मुंडे यांच्या वतीने प्रा. मुंडे यांचा सन्मानपूर्ण सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला अनेक कार्यकर्ते, समर्थक व स्थानिक नागरिकांनी उपस्थित राहून शुभेच्छा व्यक्त केल्या.प्रा. टी.पी. मुंडे यांचा ३० वर्षांचा राजकीय अनुभव आणि संघटन कौशल्य पक्षासाठी निश्चितच मोलाचे ठरणार असल्याची भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. आगामी काळात त्यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्ह्यात शिवसेना संघटना अधिक सक्षम आणि सक्रिय होईल, अशी आशा व्यक्त होत आहे.

निवड - कार्यकर्त्यांचा उत्साह - भविष्यासाठी आशा या निवडीमुळे शहरात आनंदाचे वातावरण असून, बीड जिल्ह्यातील व परळी तालुक्यातील अनेक कार्यकर्त्यांकडून अभिनंदन संदेशांचा वर्षाव होत आहे. यावेळी रघुनाथ डोळस,राहुल कराड, जम्मू सेठ, श्याम गडेकर,शिवा बडे, राहुल कांदे, शिवा चिखले, हनुमंत गुट्टे,सोमनाथ आघाव, किशोर जाधव, मधुकर ढाकणे, अर्जुन बुंदिले, विलास कचले, सचिन गीते, अनंत महाराज मुंडे, अरुणाचल रोडे, आदीसह कार्यकर्त्यांनी फटाके फोडून जल्लोष साजरा केला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077